UGC Approved Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April 2018, Issue-40, Vol-04

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

13) EFFECTIVENESS OF BRAND PREFERENCE ON CONSUMERS WITH ....
Dr. SHAIKH TABASSUM HAMEED, KALABURGI 585102, KARNATAKA || 55

14) WOMEN TRAFFICKING IN INDIA DURING 2011 TO 2016
Satendra Kumar Sharma, Allahabad || 60

15) Job Satisfaction Among Higher Secondary Schools Teachers of Bilaspur....
Dr. Anita Singh, Chhattisgarh Bilaspur || 63

16) THE INFLUENCE OF MEDIUM AND LEVEL OF EDUCATION ON NEEDS OF ....
Mrs.Kamlesh Upadhyay, Neemuch (MP) || 69

17) An Analysis of SSA in Upliftment of Socio-Economic Status in some .....
Dinesh Yadav, University of Allahabad || 71

18) Application of Graph Theory in Transportation
Sanjay Kumar Bisen, Bhopal - Dr. Brajendra Tiwari, Bhopal (M.P.) || 78

19) वैचारिक वाङ्मयाची संकल्पना व स्वरूप
डॉ.नागनाथ लक्ष्मण आवले, कलबुर्गी || 83

20) लोकसंस्कृतीचा उपासक: पोतराज
—डॉ.बी.आर.दहिफळे, उदगीर जि.लातूर || 84

21) इंदिरा सागर प्रकल्पा अंतर्गत पुनर्वसित लोकांच्या सामाजिक व आर्थिक ...
प्रा. हरेश टि. गजभिये, चिमूर, जिल्हा चंद्रपूर || 88

22) कॅशलेस अर्थव्यवस्था:—एक दृष्टीक्षेप
प्रा.निलेश दे. हलामी, देसाईगंज जि.गडचिरोली || 91

23) क्रांतीकारक : बिरसा मुंडा
प्रा.डॉ. महावीर वि. कांबळे, रेठरे बुद्रुक, ता.कराड, जि.सातारा || 94

24) जागतीकीकरण आणि कृषी क्षेत्र
प्रा. संतोष ए. कावरे, तुकूम, चंद्रपूर || 97

25) वि.स.खांडेकरांच्या साहित्यातील सामाजिकता
प्रा.एकनाथ शामराव पाटील, हातकणंगले, जि. कोल्हापूर || 101

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

116

प्रभाव होतो तसेच प्रकल्पाअंतर्गत विस्थापितांना सद्या मिळणाऱ्या उत्पन्नाची पर्याप्तता व त्यांच्या कौटूंबिक सदस्यांची संख्या या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंध आहे. म्हणजेच कुटूंबात सदस्यांची संख्या अधिक असल्यास मिळणारे उत्पन्न अपर्याप्त ठरते.

**संदर्भ**


१. डॉ. विलास खंदारे, प्रकल्पग्रस्त समस्या आणि उपाय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २४ एप्रिल २०१४

२. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, मार्च १९९९.

३. उपनिर्दिष्ट

४. सिंचन स्थिती दर्शक अहवाल, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, सप्टेंबर, २००६,

५. बेलसरे आणि आडे, महाराष्ट्र सिंचन विकास, महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, पुणे, ऑक्टोंबर—डिसेंबर—२००५.

६. भूसंपादन व पुनर्वसन, संक्षिप्त टिप्पणी, गोसीखुर्द पुनर्वसन विभाग, आंबाडी (भंडारा), माहे ऑक्टोंबर, २००९

७. गोसीखुर्द (इंदिरा सागर) प्रकल्प, महाराष्ट्र शासन अंगीकृत, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर


**22**

# कॅशलेस अर्थव्यवस्था :— एक दृष्टीक्षेप


प्रा.निलेश दे. हलामी

(वाणिज्य विभाग)

आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,

देसाईगंज जि.गडचिरोली (म.रा.)


==============**********===============


**सारांश :—**

८ नोव्हेंबरला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक हंजार आणि पाचशे रूप्यांच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णायांनतर देशभरात कॅशलेस व्यवहार करण्याची मोहीम सुरू झाली. लोकांजवळील पैसा मर्यादित असल्यामुळे कॅशलेस व्यवहाराकडे लोकांची वाटचाल चालू झाली.या लेखा द्वारे कॅशलेस अर्थव्यवस्था ,कॅशलेस व्यवहार पदध्ती , फायदे व सर्वसामान्य नागरीकांनी घ्यावयाची काळजी यांची चर्चा केली आहे. आणि लोकांमध्ये कॅशलेस व्यवहार वाढवण्यासाठी नागरीक ,समाजसेवी संस्था व बॅकांची जबाबदारी व निष्कर्ष सांगण्यात आली आहे.



**कीवर्ड :—** कॅशलेस ,कॅशलेस व्यवहार पदध्ती ,फायदे ,काळजी ,जबाबदारी.


**प्रस्तावना :—**

सद्यास्थितीत भारत जर जगामध्ये प्रकाश झोतात आहे, त्याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था आणि हीच अर्थव्यवस्था अजुन बळकट करण्यासाठी कॅशलेस व्यवहारांचा मार्ग स्विकार करायला हवा! भारत सरकारने ८ नोव्हेंबर,२०१६ रोजी नोटाबंदीचा निर्णय घेतला व चलनातील ८६ टक्के चलन बंद केले असल्याने चलनाचा तुटवडा निर्माण झाला त्यामुळे काही काळ नागरिकांना त्रास सुध्दा सहन करावे लागले. त्यामुळेच अचानकपणे कॅशलेस व्यवहारामध्ये मोठयाप्रमाणात वाढ झाली. लोकांजवळील पैसा मर्यादित



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

झाल्यामुळे कॅशलेस व्यवहाराकडे लोकांची वाटचाल चालू झाली. माननीय पंतप्रधानांनी अधिकृत ट्वीटर हॅडलवरून कॅशलेस व्यवहारांसाठी आग्रह धरून . "मेरा मोबाईल..मेरा बॅक..मेरा बटुआ" असा संदेश देत कॅशलेस अर्थव्यवस्थेवर जोर दिला आहे.

कॅशलेस अर्थव्यवस्था —

कोणत्याही नगद राशी किंवा रोख रक्कमेशिवाय सर्व आर्थिक व्यवहाराचे देवाणघेवाण करणे होय. आर्थिक व्यवहार करतांना कोणत्याही रोख रक्कमेचा वापर न करता ते व्यवहार डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, चेक, डीडी, नेट बॅकिंग, इ वॉलेट, इत्यादी मार्फत पैशाची देवाणघेवाण करणे.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असून हया तंत्रज्ञानाच्या साहयाने कॅशलेस अर्थव्यवस्था हि अशक्य गोष्ट शक्य झाली आहे. जगात स्वीडन ,यु.के. ,कॅनडा ,फ्रॅन्स ,बेल्झीयम ,नेदरलॅंड ,यु.एस. यासारख्या देशात मोठयाप्रमात आर्थिक व्यवहार हे कॅशलेस ने होतात. त्यामुळे कॅशलेस आर्थिक व्यवहार केल्याने पुढील फायदे आहेत.

**कॅशलेस अर्थव्यवस्थेचे फायदे :—**

१. भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत होईल.
२. नोटा छापण्यासाठी लागणांऱ्या पैश्याची बचत होईल.
३. आयकरापासून वाचण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना लगाम लागेल.
४. आंतकवादी व नक्षलवादी कारवायांना चाप बसेल.
५. सध्याची कर प्रणाली सुटसुटीत होईल.
६. काळया पैश्यावर अवलंबून असणारे अवैध व्यवहार बंद होतील.
७. त्वरित व्यावहारिक काम करण्यास मदत होईल.
८. शेतकरी ,कामगार आणि लघुव्यावसायिक अनेक व्यवहार जलद गतीने करू शकतात.
९. पैशांच्या उलाढालीची माहिती मिळवणे सोपे होईल.
१०. सरकारला किमान वेतन कायद्यावर लक्ष देता येईल.
११. ज्या ठिकाणी बॅकिंगच्या सुविधा नाहीत अशा ठिकाणी ई पेमेंट किंवा मोबाईल बॅकिंगच्या माध्यमातून सहज व्यवहार करता येईल.
१२. कल्याणकारी योजनांच्या निधी लाभार्थ्यांच्या खात्यात सहज पोहचवता येईल.

**कॅशलेस आर्थिक व्यवहाराचे पर्याय —**

कॅशलेस आर्थिक व्यवहार करण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत. ते खालील प्रमाणे—

**१) चेक द्वारे पेमेंट :—**

चलनी नोटाशिवाय आर्थिक व्यवहारामध्ये चेक ने आर्थिक व्यवहार करणे हि सर्वात जुनी पध्दत असून ती सर्वांना परिचयाची आहे. या पध्दतीत एखादयाला एक नियोजित रक्कम चेकने देऊ शकता ,तो ती रककम त्याच्या बॅकेतील खात्यात जमा करेल किंवा तो संबंधीत बॅकेतून रोख रक्कम ही काढू शकतो.

**२) डिमांड ड्राफ्ट :—**

हि पध्दती पेमेंट स्वीकारण्यासाठी सर्वात सुरक्षित आर्थिक व्यवहार पध्दती मानली जाते.ज्या व्यक्तीला पेमेंट करावयाचे आहे त्याच्या नावाने बॅकेतून डीडी बनवून त्या व्यक्तीला पाठविले जाते.

**३) ऑनलाईन हस्तांतरण (RTGS/NEFT) :—**

कॅशलेस व्यवहारासाठी हि सर्वात सोपी पध्दत आहे. या पध्दतीत ऑनलाईन रक्कम हस्तांतरित करण्यासाठी नेट बॅकिंग सूविधा असणे गरजेचे आहे त्यामुळे या पध्दतीत आर्थिक व्यवहार कोणत्याही ठिकाणवरून इंटरनेट वापरून करू शकतो. तसेच बॅकेच्या माध्यमातून सुध्दा ऑनलाइन हस्तांतरण करता येतो.

**४) पी.ओ.एस.—पॉइंट ऑफ सेल**

कॅशलेस व्यवहारासाठी ही एक पध्दती आहे जिच्या भारतामध्ये मर्यादित स्वरूपात वापर असून ते सध्या वाढत आहे. यामध्ये डेबिट किंवा क्रेडिट कार्डचा वापर करून वस्तूची खरेदी करता येतो व स्वाईप मशीन द्वारे पेमेंट करता येतो.

**५) यु.पी.आय प्रणाली.—युनिफाइड पेमेंट इंटरफेस**

यु.पी.आय. हि एक मोबाइल पेमेंट प्रणाली आहे जी स्मार्टफोनवर विविध आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा देते. प्रत्येक बॅकेचे स्वतःचे मोबाईल ॲप आहेत. त्यामुळे आता स्मार्ट फोन वरून व्यवहार करणे शक्य आहे.

**६) ई—वॉलेट —**



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College, Desaiganj (Wadsa) Dist- Gadchiroli

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

या पध्दतीचा वापर किरकोळ वस्तू खरेदी पासुन ते विमान तिकीटे बुकिंग करण्यासाठी तसेच ऑनलाईन वस्तू खरेदीसाठी केला जातो. त्याकरिता आपल्या सोयीसाठी एक ई—वॉलेट ॲप डाउनलोड करावे लागते. मोबाईल नंबर रजिस्टर करून या ॲप मधून डेबिट किंवा क्रेडिट कार्ड किंवा नेट बॅंकिंगशी जोडले जाते.मोबाईल वा कंम्प्युटरच्या सहायाने व्यवहार करणे शक्य आहे.

**७) मोबाईल वॉलेट —**

या पध्दतीत डेबिट किंवा क्रेडिट कार्ड किंवा नेट बॅंकिंग पासवर्डची आवश्यकता नसतो फक्त मोबाईल वॉलेट मध्ये आय.एम.पी.एस.द्वारे पैसे भरावयाचे आणि ते खर्चासाठी वापरावयाचे .उदा.—पेटीएम ,पेमेंनी ,ऑक्सीझन इत्यादी. ॲप्स.

**८) यू.एस.एस.डी.—**

जर स्मार्टफोन आणि इंटरनेटची सुविधा नसेल तर ही पध्दत वापरू शकता. ही एक मोबाइल बॅंकिंग सुविधा आहे. कोणत्याही मोबाइल फोन वरून '९९रु असा यू.एस.एस.डी. क्रमांक डायल करून ही सुविधा वापरू शकता यासाठी मोबाईल क्रमांकची नोंद मोबाईल बॅंकिंग साठी करून घ्यावी लागते. या पध्दतीमध्ये खात्यावरील शिल्लक रक्कम पाहणे , इतरांच्या खात्यावर पैसे हस्तांतरीत करणे असे व्यवहार करता येतात.ही सुविधा सर्व बॅंकामध्ये उपलब्ध आहे

**९) ए.ई.पी.एस.—आधार सक्षम पेमेंट प्रणाली —**

ही पध्दती सर्वोत्तम मानली जाते. या प्रणालीचे कार्य एखादया मायक्रो एटीएम सारखे असते जी स्मार्टफोन व फिंगर प्रिंट स्कॅनरचा वापर करून चालते. ही पध्दती वापरण्यासाठी आधार क्रमांक बॅंक खात्यांशी जोडणे बंधनकारक असते या पध्दतीने पेमेंट आधार क्रमांकवरून इतरांच्या आधार क्रमांकवर पाठवू शकता किंवा स्विकारू शकता त्याचप्रमाणे बॅंकेतून पैसेही काढू शकता.

**जबाबदारी सर्वसामान्य नागरिकांची :—**

कॅशलेस आर्थिक व्यवहार करतांना सर्वसामान्य नागरिकांना काही गोष्टीची काळजी व जबाबदारी घ्यावी लागते ते पुढिल प्रमाणे—

१. आपले प्रत्येकाचे राष्ट्रीयकृत बॅंकेत एकतरी खाते असणे गरजेचे आहे.
२. प्रत्येकाने पॅन व आधार कार्ड काढणे गरजेचे आहे.
३. आपला मोबाइल नंबर बॅंक खात्याला जोडला असणे गरजेचे आहे.
४. बॅंकेतून डेबीट कार्ड जरूर काढून घ्या.
५. नेट बॅंकिंग साठीचा कस्टमर आयडी व पासवर्ड घ्या.
६. अत्यंत महत्वाचे म्हणजे आपला कस्टमर आयडी ,एटीएम पिन ,कोणताही पासवर्ड , एम पिन ,ओटीपी यासारख्या गोपनिय गोष्टी कुठल्याही त्रयस्त व्यक्तीला ,बॅंकेच्या अधिकाऱ्यांना किंवा फोन वरून विचारणा केली असता सांगू नका. कोणतीही बॅंक अथवा बॅंकेतील अधिकारी फोन द्वारे बॅंक खात्याशी संबंधीत गोपनीय गोष्टीची चौकशी करीत नाही.
७. नेट बॅंकिंग करतांना व्हर्च्युअल कीबोर्डचा वापर करा.
८. बॅंकिंग व्यवहार करतांना इतर व्यक्तीचा ,ठिकाणाचा ,कॅम्प्युटर ,लॅपटॉप वापरला असेल तर बॅंकिंग व्यवहाराची हिस्टरी डिलीट करा. कॅशलेस व्यवहार करताना हॅकिंग चे प्रमाण वाढण्याची शक्यता तर नाकारता येत नाही त्यामुळे व्यवहार करताना काळजी घ्या व काहीं अडचण आल्यास आपल्या बॅंक अधिकाऱ्यांशी लगेच संपर्क साधा.

**जबाबदारी सर्वसामान्य नागरिकांची ,समाजसेवी संस्थेची व बॅंकांची :—**

अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करावयाचे असेल तर कॅशलेस आर्थिक व्यवहार व्हायला पाहिजे त्यासाठी कॅशलेस व्यवहाराचे मोठया प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे त्याकरीता नागरिकांची ,समाजसेवी संस्था व बॅंकेची काही जबाबदारी आहेत ते पुढिल प्रमाणे—

१. ज्यांची राष्ट्रीयकृत बॅंकेत खाती नाहीत त्यांना खाते काढण्यास मदत करणे.
२. नेट बॅंकिंग ,कॅशलेस व्यवहार या बाबतीत ग्रामीण भागामध्ये चर्चा सत्रे ,कार्यशाळा यादृवारे प्रबोधन करणे.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

३. जेष्ट नागरिकांना कॅशलेस व्यवहारांसंबंधी योग्य माहिती देणे.

निष्कर्ष :—

भारत सरकारने ८६ टक्के चलन बंद केल्यामुळे चलनाचा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे आर्थिक व्यवहार करण्यास अडचण झाली. सरकारने कॅशलेस व्यवहार वाढविण्यासाठी वेगवेगळया जाहिरात पध्दतीने तसेच काही कॅशलेस व्यवहारावर सरकार मार्फत सुट सुध्दा देण्यात आली. हा पेपर कॅशलेस व्यवहाराचा एक अभ्यास आहे. कॅशलेस व्यवहाराचे विविध पध दती ,फायदे ,नागरिकांनी घ्यावयाची काळजी ,नागरिक,समाजसेवी संस्था व बॅकेचे जबाबदाऱ्यांचा अभ्यास केला आहे जेणेकरून मुलभूत कॅशलेस व्यवहार समजण्यास मदत करेल.

संदर्भ सुची :—


१. http://www.ijcter.com/- Impact and Importance of Cashless Transaction in India Ms.Pranjali A. Shendge, Mr. Bhushan G. Shelar,Asst.Prof. Smitaraja S. Kapase3/ Volume 3 Issue 4, April 2017
२. https://www.youtube.com/watch?v=66tqH-TO-Gs&t=11s / Pros and Cons of Cashless Economy
३. https://www.youtube.com/watch?v=srQUJ1KcVrY - Cashless Economy
४. https://www.youtube.com/watch?v=HcSIzUQlh3A - India Move to Cashless Transactions after Demonetisation Move by PM Modi
५. https://www.youtube.com/watch?v=WxOGWm_ClyU&t=209s- Ashtech.in | Cashless Economy [Marathi], Digital Transactions in India |
६. महाराष्ट्र शासन लोकराज्य मासिक जाने.२०१७
७. https://www.researchgate.net/publication/316429363_Cashless_transaction_Modes_advantages_and_disadvantages - Cashless transaction: Modes, advantages and disadvantages


23

# क्रांतीकारक : बिरसा मुंडा


प्रा.डॉ. महावीर वि. कांबळे
कश्णा महाविद्यालय रेठरे बुद्रुक
ता. कराड, जि.सातारा


==============**********===============

**प्रस्तावणा:**

बिहारमधील अदिवासी मुंडा जमातीत रांची जिल्हयातील उलीहातू या खेडेगावात १५ नोव्हेंबर १८७५ रोजी बिरसाचा जन्म एका गरिब अदिवासी कुटुंबात झाला. वडील सुगना मुंडा व आई करमीहातू यांच्या पोटी जन्मले. हलाकी व गरिबीमुळे ईसाई ध र्मात बिरसाचे कुटुंब गेले. बिरसा हा लहानपणापासून गरिब, शांत, आज्ञाधारक होता. तो खोटे कधी बोलत नसे, अन्याय सहन करणे हा त्याचा स्वभाव नव्हता. बिरसाने ख्रिस्ती मिशनरीमध्ये शिक्षणाचे धडे घेतले. शाळेमध्ये असणाऱ्या कडक शिस्तीमुळे त्याचे बालपण घडत गेले. बिरसा हा हुशार व बुद्धीमान होता. हे वडिलांच्या ध्यानात आले. त्यामुळे त्यांच्या वडिलांनी माध्यमिक शिक्षण चाईबासा येथील जे.ई. एल. मिडलस्कूलमध्ये शिक्षण घेण्यासाठी दाखल केले. बिरसा शाळेत रमलेला होता. बाहेरील वातावरणाचा शोध घेण्याइतपत त्याची बुद्धी कुशल झाली होती. त्याच काळात इंग्रजांचा आपल्या लोकांच्यावर अन्याय करत होते. तो ते पहात होता. त्यातूनच त्याच्या मनात क्रांतीकारक विचाराचे बीज मनात निर्माण होऊ लागले.

बिहारमधील छोटा नागपूर हा मुळात अदिवासींचा प्रदेश होता. तेथील नैसर्गिक संपत्तीवर आदिवासींचा पुरातत्वापासून मालकी हक्क होता. पण काही काळानंतर ब्रिटिशांचे शासन राज्यकारभार करू लागले. त्यामुळे येथे असणारा जमिनदार, पुरोहित, ठेकेदार, सावकार, व्यापारी या सर्व श्रीमंत लोकांनी बिहारमधील छोटा नागपूर हा प्रदेश बळकावला. या सर्वांनी आदिवासींच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

114